मार्गदर्शक सूचना

जा.क्र./विप्र-७/विघयो/मासु/१६-१७/ ४५१/२०१६
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००५
दिनांक :- २५ ऑगस्ट, २०१६

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद --------(सर्व)

२) कृषि विकास अधिकारी,
जिल्हा परिषद --------(सर्व)

विषय :- सन २०१६-१७ मध्ये अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत अनुसूचित जाती / नवबौध्द शेतकऱ्यांना शेतीसाठी अर्थ सहाय्य देण्याची योजना (विघयो) राबविण्यासाठी मार्गदर्शक सुचना

संदर्भ :- १) कृषि, व पदुम विभाग शासन निर्णय क्र. विघयो-१५१६/प्र.क्र.२४०/४-अे, दि. ३० जुलै, २०१६
२) कृषि, व पदुम विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. विघयो-१५१६/प्र.क्र.२४०/४-अे, दि. २४ ऑगस्ट, १६

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत अनुसूचित जाती / नवबौध्द शेतकऱ्यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याची योजना राज्यात राबविण्यात येईल. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात शेतकऱ्यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याची योजना राज्यात राबविण्यासाठी शासनाने संदर्भिय दि. ३० जुलै, २०१६ च्या शासन निर्णयानुसार दारिद्रय रेषेच्यावर आणण्यासाठी अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत शेतकऱ्यांना अर्थसहाय्यसाठी रु. १९६३४.३१ लाख निधीच्या कार्यक्रमास प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयाच्या प्रति सर्व संबंधीतांना पृष्ठांकीत करण्यात आल्या आहेत, तसेच, शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरही (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०८०११३०४४९४००१ असा आहे.

योजना अंमलबजावणीच्या दृष्टीने मार्गदर्शक सूचना या पत्रासोबत पाठविण्यात येत आहेत तसेच कृषि विभागाच्या संकेत स्थळावर (www.mahaagri.gov.in) त्या प्रसिध्द करण्यात येत आहेत. **संदर्भिय शासन निर्णया सोबतच्या परिशिष्ठ १ ते ३ चे अधिन राहून सदर मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.** त्यानुसार योजनेच्या अंमलबजावणीची कार्यवाही तात्काळ सुरु करुन योजने अंतर्गत उपलब्ध करुन दिलेला निधी पुर्णतः खर्च करण्याबाबत दक्षता घ्यावी.

संचालक
(विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत - माहितीस्तव सविनय सादर.

(१) मा. अपर मुख्य सचिव, (कृषी व पणन) कृषि व पदुम विभाग , मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
(२) मा. सचिव (सामाजिक व न्याय विभाग), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
(३) मा. संचालक, सामाजिक न्याय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

प्रत : माहीती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

(१) विभागीय कृषि सहसंचालक, ---------- (सर्व) - अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत अनुसूचित जाती / नवबौध्द शेतकयांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याची योजना (विघयो) (२४०१-१११४) अंतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात योजना राबविण्याकरिता बीडीएस प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेले अनुदान रु १३७८५.७३ लाख सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार आपल्या विभागातील जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद यांना बीडीएस प्रणालीव्दारे वाटप करण्यात यावे व विभागस्तरावरुन लेखा अधिकारी यांची मूळ सहीची अनुदान वाटपाची प्रतही संबंधीतांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

(२) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद---------- (सर्व)

सन २०१६-१७ करिता अनुसुचित जाती उपयोजने अंतर्गत दारिद्रय रेषेखालील अनुसुचित जाती/नवबौध्द शेतक-यांना कृषि विकासासाठी अर्थसहाय्य देण्याची योजना (वि.घ.यो.)

मार्गदर्शक सुचना

प्रस्तावना : अनुसूचित जाती/नवबौध्द शेतक-यांचे कृषि उत्पन्न वाढवून त्यांना दारिद्रय रेषेवर आणण्यास सहाय्य करण्याचे दृष्टीने शासनाच्या कृषि विभागामार्फत विशेष घटक योजना सन १९८२ पासून राज्यात राबविण्यात येते. सदर योजनांतर्गत. अनुसूचित जाती / नवबौध्द प्रवर्गातील शेतकऱ्यांना १) जमीन सुधारणा, २) निविष्ठा पुरवठा, ३) पीक संरक्षण/शेतीची सुधारीत अवजारे, ४) बैलगाडी, ५) बैलजोडी/रेडेजोडी, ६) इनवेल बोअरिंग, ७) जुनी विहीर दुरुस्ती, ८) पाईप लाईन ९) पंप संच १०) नवीन विहीर ११) शेततळे १२) परसबाग लागवड १३) तुषार/ठिबक सिंचन संच व १४) ताडपत्री या बाबींचा लाभ देण्यात येतो. प्रचलीत योजनेच्या धर्तीवर सन २०१६-१७ मध्ये सदर योजना राबविण्याचे दृष्टीने पुढील प्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

योजनेचे उद्दिष्ट :- अनुसूचित जाती व नवबौध्द शेतक-यांचे कृषि उत्पादन वाढीस सहाय्य करुन त्यांच्या आर्थिक उन्नतीस मदत करणे

१. लाभार्थी निवडीचे निकष :-

१.१ जमीन धारणा :- ज्या शेतक-यांकडे त्यांच्या स्वतःचे नावे ६.०० हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी शेतजमीन असेल असे शेतकरी लाभार्थी म्हणून निवडीस पात्र राहतील. त्यासाठी शेतजमिन धारणेचा अद्यावत दाखला ७/१२ व ८-अ अर्जासोबत सादर करणे संबंधीत लाभधारकास बंधनकारक राहील. शेतजमीनीबाबत ७/१२ व ८-अ उताऱ्याचे अनुषंगाने भविष्यात काही समस्या उद्‌भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कागदपत्रे स्वाक्षरीत करणाऱ्या कर्मचारी/अधिकारी यांची राहील.

१.२ जातीबाबतचा दाखला :- लाभार्थी हा अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील शेतकरी असणे बंधनकारक आहे. दारिद्र्य रेषेखालील (बी.पी.एल) यादीमध्ये ज्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील व्यक्तीचे नांव समाविष्ठ असेल अशा लाभधारकांसाठी शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीचा वैध दाखला ग्राह्य धरावा. त्याबाबत काही समस्या उद्‌भवल्यास त्याची जबाबदारी संबंधित दाखला देणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची राहील. अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत दारिद्र्य रेषेखालील अनुसुचित जातीच्या व्यक्तीसाठी ज्या योजना असतील त्या योजनेकरीता समाजकल्याण विभागाच्या दिनांक ७ जानेवारी १९९७ चे परिपत्रकातील सुचनांप्रमाणे पुन्हा तहसिलदार यांच्या सहीचा जातीचा दाखला आवश्यक राहणार नाही.

दारिद्रय रेषेखालील यादीमध्ये (बीपीएल) लाभार्थ्यांचा समावेश नसेल तर अशा लाभार्थींसंबंधी प्रस्तुत योजनेंतर्गत लाभार्थी निवडीच्या सुचना खालीलप्रमाणे आहेत.

१.३ उत्पन्नाचा दाखला : दारिद्रय रेषेखालील (बीपीएल) यादीत अंर्तभुत शेतक-यांसाठी वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेची अट राहणार नाही. मात्र, अन्य अनुसूचित जाती व नवबौध्द शेतक-यांच्या बाबतीत ज्या शेतकऱ्यांची जमीनधारणा ६ हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी आहे आणि ज्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये ५०,०००/- चे मर्यादेत आहे असे शेतकरी लाभासाठी पात्र ठरतील. अशा शेतक-यांनी संबंधीत तहसिलदार यांचेकडून **सन २०१५-१६ चे उत्पन्नाचा** अद्यावत दाखला घेणे व अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहिल.

शिधापत्रिका असणाऱ्या शेतकऱ्यांचेच अर्ज स्वीकारण्यात यावेत. सदर योजनेमधुन दुबार लाभार्थी होवू नयेत म्हणुन तसेच अर्जदाराची माहिती सुलभपणे प्राप्त होण्यासाठी योजनेचा लाभ घेऊ ईच्छिणाऱ्या अर्जदारास अर्जासोबत आधार कार्डाची प्रत जोडण्यास उद्युक्त करण्यात यावे.

२. लाभार्थी निवडीचा प्राधान्यक्रम:

२.१. अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील दारिद्रय रेषेखालील शेतकऱ्यांशिवाय इतर शेतकरी ज्यांची जमीनधारणा सहा हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा इच्छूक शेतकऱ्यांची खालील प्राधान्य क्रमाने जिल्हा निवड समितीने निवड करावी.

अ) ६ हेक्टर मर्यादेपर्यंतचे दारिद्रय रेषेखालील शेतकऱ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

ब) दारिद्रय रेषेखालील (बीपीएल) यादीमध्ये नाव नसेल परंतु ज्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे एकुण वार्षिक उत्पन्न रु. ५००००/- पर्यंत असेल तर प्रस्तुत योजनेंतर्गत लाभार्थी निवडीस खालीलप्रमाणे प्राधान्य देण्यात यावे.

१) २ हेक्टर पर्यन्त जमीनधारणा असलेल्या शेतक-यांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

२) २ हेक्टर ते ४.०० हेक्टर जमीनधारणा असलेल्या शेतक-यांना द्वितीय प्राधान्य.

३) ४.०० ते ६.०० हेक्टर जमीनधारणा असलेल्या शेतक-यांना तृतीय प्राधान्य.

२.२. शेतकरी स्वतः शेती विकास योजनेची कामे हाती घेण्यास इच्छूक असावा.

३. लाभार्थी निवड समिती : सदर योजनेस तालुका स्तरावर गट/खंड विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी विविध प्रसिध्दी माध्यमांद्वारे व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी. योजनेची सविस्तर माहीती सुचना-फलकावर प्रसिध्द करावी. **ग्रामसभेने शिफारसीत केलेल्या शेतकऱ्यांमधील इच्छूक शेतकऱ्यांकडून अर्ज/प्रस्ताव मागवावेत**. प्राप्त अर्जांची/प्रस्तावांची योजनेच्या निकषांआधारे काटेकोरपणे छानणी करावी. पात्र ठरणा-या अर्जदारांची यादी त्यांनी तात्काळ जिल्हास्तरीय समितीकडे शिफारसीसह पाठवावी. छानणीत अर्ज अपात्र ठरणा-या अर्जदारास त्याचे कारणांसह उणीवांच्या पूर्ततेस पुरेसा कालावधी देवून लेखी कळवावे. अर्जदाराने संबंधीतांनी उणीवांची पूर्तता केल्यास त्याबाबत खात्री करावी व ज्या दिनांकास परिपूर्ण अर्ज/प्रस्ताव प्राप्त होईल त्या दिनांकास तो क्रमवारीत नोंदवावा. तालुकास्तरावर तयार करण्यात येणाऱ्या पात्र अर्जदार/लाभधारकांचेबाबत भविष्यात काही उणीवा/समस्या उदभवल्यास त्यास संबंधीत कृषि अधिकारी पंचायत समिती व गट विकास अधिकारी सर्वस्वी जबाबदार राहतील.

पंचायत समिती स्तरावरुन जिल्हा परिषद कार्यालयास शिफारसीसह प्राप्त होणा-या पात्र अर्जदारांच्या तयार केलेल्या यादीमधून जिल्हा स्तरावर लाभार्थ्यांची निवड अंतीम करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती राहील,

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.	-	अध्यक्ष
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी	-	सदस्य
कार्यकारी अभियंता, लघुसिंचन, जि.प.	-	सदस्य
भूजल सर्वेक्षण यंत्रणेचे जिल्हास्तरीय अधिकारी	-	सदस्य
जिल्हा समाज कल्याण अधिकारी	-	सदस्य
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी (जिल्हा परिषद)	-	सदस्य
कृषि विकास अधिकारी, जि. प.	-	सदस्य सचिव

जिल्हास्तरीय समितीने सर्व प्राप्त अर्जांची/प्रस्तावांची योजनेच्या निकषांआधारे काटेकोरपणे छाननी करावी. **जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) व कृषि अधिकारी हे पात्र प्रस्ताव छाननी कामासाठी जबाबदार राहतील**. छाननीअंती पात्र ठरलेल्या अर्जदारांची/प्रस्तावांची यादी, निवड केलेल्या शेतकरी लाभार्थ्यांची यादी गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना पाठवावी तसेच संबंधीत शेतकऱ्यास लेखी कळवावे. अपात्र ठरणा-या अर्जदारांस त्याचे कारणांसह उणीवांच्या पूर्ततेस पुरेसा कालावधी देवून तसे लेखी कळवावे. अर्जदाराने/ संबंधीतांनी उणीवांची पूर्तता केल्यास त्याबाबत खात्री करावी व ज्या दिनांकास परिपूर्ण अर्ज/प्रस्ताव प्राप्त होईल त्या दिनांकास तो क्रमवारीत नोंदवावा. जिल्हास्तरावर अंतीम करण्यात येणा-या पात्र अर्जदार/लाभधारकांचेबाबत भविष्यात काही उणीवा/समस्या उदभवल्यास त्यास संबंधीत जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) व कृषि विकास अधिकारी जबाबदार राहतील. निवड अंतीम करताना महीला लाभार्थी, अपंग लाभार्थी इत्यादींबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश विचारात घेवून त्या प्रमाणानुसार संबंधीत लाभार्थींची निवड करण्याची जिल्हास्तरीय समितीची जबाबदारी राहील. **योजनेसाठी मोठया प्रमाणात पात्र शेतकऱ्यांकडुन मागणी आल्यास, जिल्हा स्तरावर लाभार्थी निवड करतेवेळी वेगवेगळया गटातील (उदा. अपंग शेतकरी, महीला शेतकरी व सर्वसाधारण शेतकरी) शेतकऱ्यांसाठी ईश्वरचिठठी पध्दतीचा अवलंब करावा. कोणत्याही परिस्थितीत कृषि आयुक्तालयाने दिलेल्या उद्दिष्टापेक्षा जास्त लाभार्थ्यांची निवड करु नये.**

लाभार्थी निवड करताना समितीने घ्यावयाची दक्षता - सदर योजनांतर्गत निवड करण्यांत आलेल्या लाभार्थ्यांना दोन आर्थिक वर्षाच्या कालावधीत योजनांतर्गत मंजूर विविध घटकांचा लाभार्थ्यांच्या मागणीनुसार उपलब्ध अनुदान मर्यादेत व प्रती लाभार्थी विहीत उच्चतम अनुदान मर्यादेत लाभ द्यावयाचा आहे. त्यानुसार सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात निवड करण्यांत आलेल्या मात्र देय अनुदानाच्या कमाल मर्यादेपर्यत पूर्ण लाभ न दिलेल्या लाभार्थ्यांना प्रथम प्राधान्याने माहे ऑक्टोबर, २०१६ पर्यंत लाभ देण्यात यावा. सन २०१५-१६ चे दायीत्वाच्या नंतर उर्वरीत निधीच्या मर्यादेत सन २०१६-१७ करीता नविन लाभार्थी निवडीचे नियोजन करावे. **शासनाकडून मंजूर कार्यक्रमापैकी व प्रत्यक्षात उपलब्ध होणाऱ्या निधीच्या मर्यादेतच लाभार्थी निवड कृषि आयुक्तालयाने दिलेल्या उद्दीष्टाचे अधीन राहुन अंतीम करावी,** जेणेकरुन प्रकरणे प्रलंबीत राहण्याचा व शासनावर भविष्यात अतिरिक्त आर्थिक बोजाचा प्रश्न निर्माण होणार नाही. याबाबत सर्वस्वी जबाबदारी संबंधीत कृषि विकास अधिकारी यांची राहील.

४. लाभार्थ्यांची निवड रद्द करणे : लाभार्थीच्या निवडीचे अंतीम अधिकार जिल्हास्तरीय समितीस राहतील. खालील कारणांमुळे जर काही लाभार्थीची निवड रद्द करणे क्रमप्राप्त असल्यास त्याचे सर्वस्वी अधिकार जिल्हास्तरीय समितीस राहतील.

४.१ समितीने निवड केलेला शेतकरी मयत झाल्यास.

४.२ निवड केलेल्या शेतक-याने सर्व शेतजमीन विकून तो भुमीहीन झाला असल्यास.

४.३ निवड केलेला शेतकरी शेती विकास योजना हाती घेण्यास इच्छूक नसल्यास.

४.४ निवड केलेल्या शेतक-याने अर्थसहाय्य घेण्यास नकार दिल्यास.

४.५ निवड केलेला शेतकरी योजनेखाली घेतलेल्या अनुदानाचा गैरवापर करत असल्याचे निदर्शनास आल्यास.

४.६ लाभार्थीची निवड शासनाने विहीत केलेल्या निकषांनुसार झाली नसल्याचे आढळून आल्यास.

वरील परिस्थितीमुळे लाभार्थ्याची निवड रद्द झाल्यास त्याबाबत कागदोपत्री सर्व आवश्यक पुरावे ठेवून तसे लाभधारकास लेखी कळविणे संबंधीत कृषि विकास अधिकारी यांना बंधनकारक राहील.

४.७ मयत झालेल्या लाभधारकाबाबत त्यांचे कायदेशीर वारसांची निवड जिल्हा स्तरीय समितीने करावी व उर्वरीत अर्थसहाय्य त्यांना देण्याबाबत निर्णय घेवून कार्यवाही करावी. अशा प्रकरणी कायदेशीर बाबींची सर्वतोपरी पूर्तता करुन घेण्याची जबाबदारी जिल्हा स्तरीय समितीची राहील.

वरीलपैकी कारणांमुळे लाभार्थ्याची निवड रद्द केल्यास त्याऐवजी विहीत अटींची पूर्तता करणा-या पुढील पात्र लाभार्थ्याची विहित पध्दतीने निवड जिल्हा स्तरीय समितीने करावी.

लाभार्थींना योजनेचा लाभ वेळेवर देण्याचे दृष्टीने **माहे सप्टेंबर, २०१६ अखेर** लाभार्थी निवडीची प्रक्रीया पूर्ण करणे अनिवार्य आहे. त्यासाठी समयबध्द कार्यक्रम कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी तयार करुन सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना कळवावा व त्याचे संनियंत्रण करावे. मंजूर कार्यक्रम विचारात घेवून व प्रत्यक्षात उपलब्ध निधीच्या मर्यादेत अंतीम निवड केलेल्या लाभार्थींना लाभ द्यावा. निधी उपलब्धतेच्या प्रमाणात आवश्यकतेनुरुप लाभार्थींची निवड करावी. निवड केलेल्या लाभार्थींना शक्यतो **माहे डिसेंबर, २०१६ पर्यंत नवीन विहीर या बाबी व्यतिरिक्त अन्य बाबींचा लाभार्थींना पुर्ण लाभ देणे करीता नियोजन करण्याची दक्षता घेण्यात यावी**. जेणेकरुन अन्य बाबींच्या लाभाची प्रकरणे प्रलंबीत राहणार नाहीत.

सदर योजनांतर्गत निवड करण्यांत आलेल्या लाभार्थ्यांना दोन आर्थिक वर्षाच्या कालावधीत योजनांतर्गत मंजूर विविध घटकांचा लाभार्थ्याच्या मागणीनुसार उपलब्ध अनुदान मर्यादेत व प्रती लाभार्थी विहीत उच्चतम अनुदान मर्यादेत लाभ द्यावयाचा आहे. त्यानुसार **सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात निवड करण्यांत आलेल्या मात्र देय अनुदानाच्या कमाल मर्यादेपर्यत पूर्ण लाभ न दिलेल्या लाभार्थ्यांना प्राधान्याने सन २०१६-१७ मध्ये लाभ देण्यात यावा. तद्नंतर उर्वरीत निधीच्या मर्यादेत सन २०१६-१७ करीता नविन लाभार्थी निवडून नव्याने निवडलेल्या लाभार्थ्यांना लाभ देताना प्रत्यक्ष प्राप्त अनुदातून जेवढ्या लाभार्थींना पूर्ण लाभ देता येईल तो प्राथम्याने पूर्ण करावा,** जेणेकरुन मागील आर्थिक वर्षात निवडलेल्या लाभार्थ्यांची प्रकरणे प्रलंबित राहणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. मागील प्रकरणांवरुन असे निदर्शनास येते की, मागील आर्थिक वर्षात अपूर्ण लाभ दिलेल्या लाभार्थींचा उर्वरित लाभ पूर्ण न करता नविन आर्थिक वर्षात नविन लाभार्थी निवड करुन त्यांना लाभ दिला जातो. तद्नंतर लाभ देण्याचा दोन वर्षांच्या कालावधीची मुदत संपल्यावर अपूर्ण लाभार्थींना लाभ देण्याचे दृष्टीने मुदतवाढ देण्यासाठी आग्रह धरला जातो. ही बाब शासनाच्या सुचनांशी विसंगत ठरते. त्यामुळे **जिल्हयासाठी मंजूर आर्थिक लक्षांकातून प्रथमतः सन २०१५-१६ मधील अपूर्ण लाभ दिलेल्या शेतक-यांना प्राधान्याने लाभ दयावयाची रक्कम निश्चित करावी व नंतरच उर्वरीत अनुदानातून नव्याने लाभार्थांची निवड करावी. चालु आर्थिक वर्षात निवड केलेल्या लाभार्थ्यानां लाभ द्यावयाचे घटक लाभार्थींची लेखी मागणी घेवून निश्चित करावेत व त्यानुसार कार्यक्रम आराखडा तयार करावा. आयुक्तालयाने दिलेल्या लक्षांकापेक्षा जास्त लाभार्थ्यांची निवड कोणत्याही परिस्थितीत करु नये**. असे आढळुन आल्यास त्याची जबाबदारी कृषि विकास अधिकारी यांचेवर निश्चित करण्यात येईल.

५.प्रसिध्दी : या योजनेची माहिती सर्व शेतकरी बांधवांना व्हावी या दृष्टिने विभागीय स्तरावर विभागीय कृषि सह संचालक व जिल्हा स्तरावर कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी. गट विकास अधिकारी यांनी तालुका स्तरावर व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी. आपल्या क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थांशी संपर्क साधून त्यांच्या मार्फत देखील प्रसिध्दी द्यावी. सदर योजनेची सविस्तर माहिती पंचायत समिती स्तरावर गट विकास अधिकारी, कृषि अधिकारी (वि.घ.यो.) तसेच जिल्हा स्तरावर जिल्हा कृषि अधिकारी (वि.घ.यो.) यांच्याकडे उपलब्ध ठेवावी. **योजनेसाठी अंतीमतः निवड केलेल्या लाभार्थ्यांची यादी ग्रामपंचायतीस पाठविण्यात यावी.**

५.१ योजनेची माहिती सर्व सामान्य लोकांना व स्वयंसेवी संस्थाना होण्याकरीता स्थानिक वर्तमान पत्रात, गावात दवंडी या द्वारे प्रसिध्दी देण्यांत यावी. **कृषि विभागाचे क्षेत्रीय कर्मचारी/ अधिकारी यांनी गावपातळी / तालुका स्तरावर प्रदर्शनाच्या माध्यमातूनही योजनेची माहिती देण्यात यावी.**

६. प्रकल्प तयार करणे : सदर योजनेतंर्गत लाभार्थ्याची निवड करण्यासाठी तालुकास्तरावर गट विकास अधिकारी यांनी कृषि अधिकारी (वि.घ.यो.) यांच्यामार्फत विहीत नमुन्यात लाभार्थीकडून अर्ज मागवावेत. अर्जाची छाननी करुन

ग्रामसभेने शिफारस केलेल्या पात्र ठरणाऱ्या लाभार्थ्यांची यादी कृषि अधिकारी, पंचायत समिती (विघयो) यांनी गट विकास अधिकारी यांचेकडे सादर करावी व गट विकास अधिकारी यांनी परिच्छेद (३) मध्ये नमुद केलेल्या जिल्हा निवड समितीच्या सदस्य सचिवांकडे शिफारस करुन सादर करावी.

६.१. जिल्हा निवड समितीने निवड केलेल्या लाभार्थी शेतक-यांचे कृषि उत्पादन वाढविण्यासाठी **कृषि अधिकारी, पंचायत समिती (विघयो) यांनी सर्वकष पिक उत्पादन आराखडा तयार करावा.**

६.१.१. प्रत्येक जिल्ह्यांचा विस्तार व फलोत्पादन विकास आराखडा तयार करण्यात येतो त्यामध्ये या योजनेचा अंतर्भाव करण्यात यावा.

६.१.२. लाभार्थ्यांना सोबतच्या परिशिष्ट (एक) नुसार योजनेतंर्गत समाविष्ट असलेल्या घटकांपैकी एक किंवा अधिक घटकांचा लाभ त्यांच्या गरजेनुसार घेता येईल. नविन विहीर या घटकाचा ज्या लाभार्थ्यांने लाभ घेतला आहे त्यांना भूस्तर प्रकारानुरुप सद्यःस्थितीतील अनुदान मर्यादा रु. ७०,०००/- ते रु. १,००,०००/- पर्यंत लाभ अनुज्ञेय राहील. भूजल सर्वेक्षणानुसार विविध जिल्हयांसाठी ठरविण्यात आलेल्या भूस्तर प्रकाराच्या खर्चाचे मापदंडाचे अधीन राहून अनुदान अनुज्ञेय राहील. नविन विहीर घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास सदर योजनेतील इतर घटकांचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. नविन विहीर या घटकाचा लाभ शक्यतो महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना या केंद्र शासनाच्या योजनेतून देवून अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत नविन विहीर या घटका व्यतिरिक्त योजनेतील इतर घटक प्रामुख्याने सुक्ष्म सिंचन, पंपसंच, पाईपलाईन, निविष्ठा, ताडपत्री व सुधारित औजारे यांचा लाभ दिल्यास लाभार्थीला सिंचन सुविधेसह कृषि उत्पादन वाढीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होतील आणि पर्यायाने त्याच्या उत्पन्नास स्थैर्य प्राप्त होईल या दृष्टीने लाभार्थ्यास उद्युक्त करावे. नविन विहीर या घटका व्यतिरिक्त इतर घटकांचा लाभ घेण्याऱ्या लाभार्थ्यांना लाभाची उच्चतम मर्यादा रुपये ५०,०००/- पर्यंत अनुज्ञेय राहील. अशा लाभार्थ्यांचा लाभ शक्यतो सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा, जेणेकरुन प्रकरणे प्रलंबीत राहणार नाहीत.

६.२ या योजनेचे मूल्यमापन त्रयस्थ यंत्रणेमार्फत करुन घ्यावयाचे असल्याने योजनेतील लाभार्थी व त्यांना दिलेले लाभ याबाबत सन १९८२-८३ पासूनची लाभार्थीची यादी संकेत स्थळावर अपलोड करावी. याबाबत आयुक्तालयास अवगत करण्यात यावे तसेच, सन २०१६-१७ या वर्षातील लाभार्थींची माहीती आर्थिक वर्ष अखेर कृषि आयुक्तालयास सादर करावी. योजनेच्या फलश्रुतीबाबत कृषि विकास अधिकारी यांनी प्रति वर्षी समग्र अहवाल आयुक्तालयास दोन प्रतीत सादर करावा.

६.३. यापूर्वी आपल्या जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या सदर योजनेतील लाभार्थ्यांच्या यशोगाथा रंगीत फोटोसह तयार कराव्यात. लोकप्रतिनिधींना सदरची कामे दाखवून त्यांचे अभिप्राय घ्यावेत. यशोगाथा व लोक प्रतिनिधींचे अभिप्राय कृषि आयुक्तालयास तात्काळ पाठवावेत.

६.४ योजनेचा लाभार्थ्यांना लाभ देतांना अनुदानाची रक्कम रोख स्वरुपांत न देता वस्तुरुपाने द्यावयाची आहे. ज्या ठिकाणी आवश्यक असेल अशा बाबीकरीता लाभार्थ्याचे बॅकेत खाते उघडून खात्यावर **अनुदानाची रक्कम आरटीजीएस/एनईएफटी व्दारे जमा करण्यांत यावी.**

६.५ वैयक्तिक लाभार्थी निवडतांना महिला व अपंग लाभार्थीना प्राधान्य देण्यात यावे.

६.६ एकूण मंजूर निधीपैकी ३ टक्के निधी अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील अपंग शेतकऱ्यांसाठी राखून ठेवावा. परंतू असे लाभार्थी प्रयत्न करुनही उपलब्ध न झाल्यास तसे आवश्यक अभिलेख संग्रही ठेऊन इतर अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील शेतकऱ्यांना लाभ देण्यात यावा.

६.७ सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये लाभ दिलेल्या लाभधारकांची यादी जिल्हा परिषद/पंचायत समिती/जिल्हा अधिकारी/समाज कल्याण विभागाच्या कार्यालयात सुचना फलकावर लावण्यात यावी. अनुदानाची नोंद पंचायत समिती स्तरावर स्वतंत्र रजिस्टरमध्ये ठेवण्यांत यावी. **सदर रजिस्टर कृषि अधिकारी (वि.घ.यो.) पंचायत समिती यांनी प्रमाणित करावे. त्याची गट विकास अधिकारी व जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांनी महीन्यातुन किमान एकदा तपासणी करुन साक्षांकीत करावे**. सदर अभिलेख वेळोवळी तपासणीसाठी वरीष्ठ अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन द्यावेत.

६.८. चालु वर्षाचा आराखडा करताना मागील वर्षाच्या लाभार्थी साठी आवश्यक असलेले अनुदान व चालु वर्षात निवड केलेल्या लाभार्थ्यांना आवश्यक असलेले अनुदान हे एकुण मंजुर झालेल्या निधीच्या मर्यादेत आहे याची कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी खात्री करावी.

६.९. लाभार्थीची निवड केल्यानंतर लाभार्थीची यादी तयार करुन विभागीय स्तरावर विभागीय कृषि सहसंचालक, जिल्हास्तरावर कृषि विकास अधिकारी, पंचायत समिती स्तरावर गट विकास अधिकारी यांचे कार्यालयात ठेवावी व तसा उल्लेख मासिक प्रगती अहवालात करण्यांत यावा.

७. अनुदानाचे स्वरुप/पध्दती : या योजने अंतर्गत निवड केलेल्या लाभार्थ्यांना अनुज्ञेय अनुदानाची रक्कम रोख स्वरुपात देय नसून योजनेतील मंजूर घटकांद्वारे द्यावयाची आहे. नविन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, बैल/रेडेजोडी या बाबींसाठी **अनुदानाची रक्कम काटेकोर पडताळणी नंतर लाभार्थ्यांचे बॅन्क खात्यात आरटिजीएस / एनईएफटी व्दारे जमा करण्यात यावी. कोणत्याही प्रकारच्या चेकव्दारे रक्कम अदा करण्यात येवू नये.**

या योजनेमध्ये एकूण चौदा बाबींवर अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे. तथापी, प्रती लाभार्थी अनुज्ञेय उच्चतम अनुदान मर्यादेनुसार (मुद्दा क्र.६.१.२) लाभार्थीस लाभ अनुज्ञेय राहील. लाभार्थ्याची कोणत्या बाबींची मागणी आहे हे लाभार्थ्याकडुन लेखी घेवून त्याप्रमाणेच लाभ देण्यात यावा.

८. खर्चाचे नियोजन :

प्रत्येक लाभार्थीची आर्थिक स्थिती, त्यांची एकूण जमीन धारणा व इतर साधनांची उपलब्धता विचारात घेऊन त्या लाभार्थ्यास कोणकोणत्या बाबींवर अर्थसहाय्य द्यावयाचे आहे याबाबतचा प्रारुप आराखडा लाभार्थीच्या सहमतीने तयार करावा. अशा प्रकारचा आराखडा तालुका स्तरावर कृषि अधिकारी (वि.घ.यो.) व **जिल्हा स्तरावर संबंधित जिल्हा कृषि अधिकारी (वि.घ.यो.)** यांनी तयार करावा व त्याप्रमाणे वित्तीय वर्षात बाबवार खर्चाचे नियोजन करावे.

९. योजनेच्या अंमलबजावणीचा कालावधी: योजनांतर्गत निवड केलेल्या प्रत्येक लाभार्थीसाठी योजना राबविण्याचा कालावधी दोन आर्थिक वर्षाचा राहील. म्हणजेच, लाभार्थीची निवड झालेले आर्थिक वर्ष २०१६-१७ व त्याच्या पुढील आर्थिक वर्ष २०१७-१८ अशा दोन वर्षाच्या कालावधीत पुर्ण लाभ देण्यात यावा. मागील आर्थिक वर्षात अपूर्ण लाभ दिलेल्या लाभार्थींचा उर्वरित लाभ पूर्ण दिल्यानंतर उर्वरित निधी विचारात घेता चालु आर्थिक वर्षात नविन लाभार्थी निवड करुन त्यांना लाभ देण्यात यावा. जेणेकरुन मागील आर्थिक वर्षात निवडलेल्या लाभार्थ्यांना परिपूर्ण लाभ देऊन प्रकरणे प्रलंबित राहणार नाहीत. **सन २०१६-१७ करीता निवडलेल्या लाभार्थ्यांना लाभ देण्याची प्रक्रिया नवीन विहीर वगळता इतर बाबींसाठी माहे डिसेंबर, २०१६ पर्यंत पुर्ण करावी व नवीन विहीरीचा पुर्ण लाभ उशीरात उशीरा माहे फेब्रुवारी, २०१८ पर्यंत देण्यात यावा. लाभार्थी त्यास देय असलेल्या काही बाबीपासुन वंचित राहिल्यास त्याची जबाबदारी कृषि विकास अधिकारी यांचेवर निश्चित करण्यात येईल.** प्रस्तुत कालावधीतच संपूर्ण लाभ देण्याचे दृष्टीने नियोजन व अंमलबजावणी करावी.

१०. अनुदानाचा गैरवापर करण्यास प्रतिबंध:-

१०.१. योजनेत निवड झालेल्या शेतक-यांनी अनुदानाचा गैरवापर केल्याचे सिध्द झाल्यास, अशा लाभार्थ्याकडून अनुदानाची वसुली करण्यात येऊ नये तथापि अशा लाभार्थ्यांना या याजनेत त्यापुढे कोणत्याही प्रकारचा लाभ देऊ नये. अशा लाभार्थ्याचे नाव काळया यादीत टाकून सर्व संबंधित इतर विभागांना पाठविण्यात यावी अशा शासनाच्या सूचना आहेत. योजनेतंर्गत निवड झालेला शेतकरी अर्थसहाय्याचा दुरुपयोग करु नये यासाठी योजना राबविणा-या अधिका-यांनी वेळावेळी भेटी देऊन तपासणी करावी प्रत्येक भेटीची नोंद दौरा दैनंदिनीत ठेवावी.

१०.२. लाभार्थीची निवड शासनाने विहीत केलेल्या निकषांनुसार झाली नसल्याचे आढळुन आल्यास अशा चुकीच्या निवडीबाबत, तसेच लाभधारकाला देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रक्कमाबांबत काही गैरव्यवहार आढळुन आल्यास त्याची जबाबदारी निश्चित करुन संबधित अधिका-यांकडून लाभार्थ्यांना दिलेल्या अर्थसहाय्याची रक्कम एकरकमी वसुल करण्यात येईल.

११. लेखा पध्दती :- सदर योजनांतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या बाबवार अर्थसहाय्याची लाभार्थीनिहाय नोंद पंचायत समिती स्तरावर मास्टर नोंदवहीत ठेवावी. **नोंदवही प्रत्येक महिनाअखेर जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांनी अद्ययावत असल्यची खात्री करुन प्रमाणित करावे. तसेच, जिल्हा कृषि अधिकारी (वि.घ.यो.) यांनी जिल्हा परिषद स्तरावर लाभार्थ्यांना देय व देण्यात आलेल्या लाभ घटकांची नोंद मास्टर नोंदवहीत ठेवणे बंधनकारक आहे.** नोंदवहीची तपासणी कृषि विकास अधिकारी यांनी महिन्यातुन एकदा करुन त्यातील नोदी साक्षांकित कराव्यात. पंचायत समिती स्तरावरील नोंदवह्या व **अभिलेख जिल्हा कृषि अधिकारी (वि.घ.यो.)**/कृषि विकास अधिकारी यांनी भेटीच्या वेळी तपासून तशी नोंद पंचायत समिती स्तरावरील नोंदवहीमध्ये करावी. अभिलेख अद्ययावत ठेवावेत व तपासणी अधिकाऱ्यास उपलब्ध करुन द्यावेत.

लाभार्थी हिस्सा / वाटा - या योजनेमध्ये बऱ्याचशा बाबी विहीत अनुदानाच्या मर्यादेत पुरवठा करण्यात येतात.

लाभार्थ्यांच्या मागणीनुसार पुरवठा करावयाच्या औजारांच्या किमती विहीत अनुदान मर्यादेपेक्षा जास्त असल्यास **अनुदाना वजा जाता लाभार्थ्यांनी भरावयाचा हिस्सा लाभार्थ्यांकडुन पुरवठादार संस्थेच्या नावे डीडीव्दारे तालुका स्तरावर कृषि अधिकारी, पंचायत समिती यांनी लाभार्थ्यास साहित्य वितरणापुर्वी स्विकारावा व तशी पोहोच लाभार्थ्यास देण्यात यावी व अशा प्रकारे प्राप्त लाभार्थी हिश्श्याचे डीडी कृषि विकास अधिकारी यांचे कार्यालयास ८ दिवसांचे आत जमा करावेत.कृषि विकास अधिकारी स्तरावर लाभार्थी हिश्श्याची स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात यावी. गुणवत्तापुर्ण साहित्या प्राप्त झाल्यची खात्री झाल्यानंतरच असे डीडी तात्काळ पुरवठादार संस्थेकडे जमा करण्याची जबाबदारी जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांची राहिल. या सर्व बाबीची सनियंत्रण कृषि विकास अधिकारी यांनी करावे.**

लाभार्थ्यांना दिलेल्या अर्थसहाय्याची लाभार्थी स्तरावर नोंद ठेवण्यासाठी लाभार्थी नोंद पुस्तिका देण्यात यावी व नोंद पुस्तिकेत दिलेल्या अर्थसहाय्याची नोंद करुन संबंधित अधिकाऱ्यांनी त्यावर स्वाक्षरी करावी.

१२. लाभार्थी शेतकऱ्यांचे प्रशिक्षण :- तालुकास्तरीय प्रशिक्षण बैठक – जिल्हास्तरीय समितीने मंजुरी दिलेल्या सर्व लाभार्थींचे तालुकास्तरावर योजनेबाबत प्रशिक्षण वर्ग आयोजित करुन त्यांना योजनेबाबत तसेच पिक उत्पादनाबाबत अद्ययावत प्रशिक्षण कृषि विकास अधिकारी व जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांनी दयावे. पिक उत्पादनाच्या सुधारित तंत्रज्ञानाबाबत तसेच योजनेचा लाभार्थी म्हणुन पार पाडावयाच्या जबाबदारीबाबत अवगत करावे. सदर प्रशिक्षण वर्गास संबंधीत तालुका कृषि अधिकारी तसेच उपविभागीय कृषि अधिकारी यांना मार्गदर्शक म्हणुन निमंत्रित करावे.

१३. तांत्रिक मान्यता :- योजनेच्या मार्गदर्शक सूचना याच योजनेसाठी तांत्रिक मान्यता समजण्यात याव्यात.

१४. मासिक प्रगती अहवाल: योजनेचा मासिक प्रगती अहवाल विहीत प्रपत्र १ (अ), (ब) मध्ये प्रत्येक महिन्याच्या **५ तारखेपर्यन्त** कृषि आयुक्तालयास, विभागीय कृषि सहसंचालक, जिल्हाधिकारी व समाज कल्याण विभागाकडे नियमीतपणे पाठविण्यात यावा. योजनेचे मासिक प्रगती अहवाल दरमहा सादर करण्याची जबाबदारी जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांची राहील. अहवालाची प्रत इमेलव्दारे कृषि आयुक्तालयास ddappscptsp@rediffmail.com वर पाठवावी. परंतू, असे निदर्शनास येते की, काही जिल्हयांचे अहवाल पाठपुरावा करुनही नियमितपणे प्राप्त होत नाहीत. अशाप्रकारे दुर्लक्ष केल्याचे आढळल्यास नाईलाजाने जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांचे विरुध्द प्रशासकीय कारवाई करणे भाग पडेल याची नोंद घ्यावी. तसेच योजनानिहाय केलेल्या तपासणीचा एकत्रित मासिक प्रगती अहवाल (प्रपत्र २ नुसार) दरमहा आयुक्तालयास सादर करण्यात यावा. सदर योजनेचा विभागीय स्तरावरुनही अपेक्षित गांभिर्याने आढावा घेतला जात नाही असे दिसते. याबाबत विभागीय कृषि सह संचालक यांनी नियमितपणे आढावा घेऊन विभागाचा संकलित अहवाल नियमितपणे कृषि आयुक्तालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

१५. तपासणी: योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टिने विहीत प्रपत्र २अ नमुन्यात खालील प्रमाणात तपासणी करण्यात यावी.

पदनाम	लाभार्थी तपासणीची टक्केवारी
१. विभागीय कृषि सह संचालक (कार्यालयातील वर्ग -२ व त्या पुढील अधिकारी) (विभागातील कार्यक्रमाच्या लक्षांका प्रमाणे प्रत्यक जिल्हयात तपासणी होईल याची दक्षता घ्यावी.)	-- ०.७५टक्के
२. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद - सर्व पंचायत समितीमध्ये संख्येच्या सम प्रमाणांत	-५ टक्के
३. जिल्हा कृषि अधिकारी (वि.घ.यो.) सर्व पंचायत समितीमध्ये संख्येच्या सम प्रमाणांत	-- १० टक्के
४. कृषि अधिकारी (वि.घ.यो.) पंचायत समितीस्तर	-- १०० टक्के

लाभार्थी तपासणी करताना लाभार्थ्यांना दिलेल्या सर्व बाबींची तपासणी करण्यात यावी. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद व विभागीय कृषि सह संचालक यांनी केलेल्या तपासणीचा अहवाल सोबत जोडलेल्या प्रपत्र-२ मध्ये कृषि आयुक्तालयास दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करावा. प्रत्येक तालुक्यात सर्व बाबींची समप्रमाणात तपासणी करण्यात यावी.

सोबत : १) परिशिष्ट (एक) व (दोन)

२) प्रपत्र - १ **(अ), (ब)**, २ (अ), **(ब), (क), (ड), ३ व ४**

संचालक
(विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

परिशिष्ट - एक

अनुसूचित जाती उपयोजना (विघयो) सन २०१६-१७ मार्गदर्शक सुचना
बाबनिहाय अनुज्ञेय उच्चतम अनुदान मर्यादा

अ.क्र	बाब	अनुदानाची टक्केवारी	उच्चतम अनुदान मर्यादा (रुपये)
०१	जमीन सुधारणा (१ हेक्टर मर्यादेत)	१००	मृद संधारण निकषानुसार रु.४०,०००/-
०२	प्रात्यक्षिकासाठी निविष्ठा वाटप (१ हेक्टर मर्यादेत)	१००	रु.५,०००/- च्या मर्यादेत
०३	पीक संरक्षण/शेतीची सुधारित अवजारे	१००	रु.१०,०००/- च्या मर्यादेत
०४	बैलजोडी/ रेडेजोडी	१००	रु. ३०,०००/- च्या मर्यादेत
०५	बैलगाडी	१००	रु. १५,०००/- च्या मर्यादेत
०६	जुनी विहिर दुरुस्ती	१००	रु.३०,०००/- च्या मर्यादेत
०७	इनवेल बोअरिंग	१००	रु.२०,०००/- च्या मर्यादेत नाबार्डच्या निकषानुसार
०८	पाईप लाईन	१००	३०० मीटरपर्यंत नाबार्डच्या निकषानुसार रु.२०,०००/- च्या मर्यादेत
०९	पंपसंच	१००	रु.२०,०००/- च्या मर्यादेत
१०	नवीन विहिर	१००	रु. ७०,०००/- ते रु.१,००,०००/- च्या मर्यादेत
११	शेततळे	१००	रु.३५,०००/- मृ.सं. निकषानुसार
१२	परसबाग कार्यक्रम	१००	रु.२००/- प्रति लाभार्थी (फलोत्पादन विभागाच्या निकषानुसार)
१३	तुषार/ ठिबक सिंचन संच पुरवठा	१००	रु. २५,०००/- च्या मर्यादेत प्रति हेक्टर (फ़लोत्पादन विभागाच्या निकषानुसार)
१४	ताडपत्री	१००	रु. १००००/- प्रति लाभार्थीच्या मर्यादेत

टिप : १) जे लाभार्थी नविन विहीर या घटकाचा लाभ घेतील, त्यांच्यासाठी प्रति लाभार्थी अनुदानाची उच्चतम मर्यादा रु. ७०,०००/- ते १,००,०००/- पर्यत अनुज्ञेय राहील. मात्र, विहीर खोदण्यासाठी खर्च कमी झाल्यास प्रत्यक्ष खर्चाच्या मर्यादेइतकेच अनुदान अनुज्ञेय राहील, शिल्लक अनुदानातुन अन्य बाबींचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

२) जे लाभार्थी नविन विहीर या घटकाचा लाभ घेणार नाहीत, त्यांच्यासाठी अनुदानाची उच्चतम अनुज्ञेय मर्यादा रु. ५०,०००/- राहील.

संचालक
(विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

परिशिष्ठ - (दोन)

(अ) घटकनिहाय अनुदान व स्वरूप

१. **जमीन सुधारणा**: जमीन सुधारणा करण्यासाठी रु. ४००००/- च्या मर्यादेत १ हेक्टर पर्यंत १०० टक्के अनुदान किंवा ग्राम विकास व जलसंधारण विभागाने निश्चित केलेल्या तांत्रिक निकषानुसार अनुदान देय राहिल. या बाबी अंतर्गत नवीन भात खाचरे, कंपार्टमेंट बंडीग, समतळ चर इत्यादी घटकाचा लाभ देता येईल. लाभार्थ्यांच्या गरजेनुसार घटक निश्चित करुन लाभ देण्यात यावा.

मृद संधारण विषयक बाबीचे तांत्रिक मापदंड त्या विभागाच्या मान्य असलेल्या मापदंडानुसार राहतील. मृद संधारण विभागाच्या वरील बाबींच्या खर्चाच्या मापदंडामध्ये वेळोवेळी जे बदल करण्यात येतील ते योजनांकरीता लागु राहतील. जमीन सुधारणा या बाबींसाठी रु.४०,०००/- पेक्षा जादा येणारा खर्च लाभार्थीने स्वतः सोसावयाचा आहे. मृद संधारण विषयक मापदंडानुसार परंतु रु. ४००००/- प्रति हेक्टरच्या मर्यादेत किंवा प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या मुल्यामापनानुसार रु. ४००००/- प्रति हेक्टरच्या मर्यादेत अनुदान देय राहिल. लाभाची रक्कम लाभार्थींच्या बॅन्क खात्यात **आरटीजीएस / एनईएफटी व्दारे** जमा करावी.

२. **प्रात्यक्षिकासाठी निविष्ठा पुरवठा**: निविष्ठा पुरवठ्या करीता रक्कम रु.५०००/- पर्यत १०० टक्के अनुदान उपलब्ध राहील. या बाबींमध्ये शेतक-यांना फक्त बियाणे, खते व पीक संरक्षण औषधी यांचा पुरवठा करण्यात यावा.

निविष्ठांचा पुरवठा करतांना भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करुन त्या भागात होणा-या प्रचलित पिकांच्या बियाण्याचे संकरीत/ सुधारित/अधिक उत्पादन देणारे वाण यांचा पुरवठा करावयाचा आहे. पिक उत्पादन आराखड्या प्रमाणे निविष्ठा वाटपाचा आराखडा तयार करण्यात यावा व त्याचप्रमाणे निविष्ठांचा हंगामापूर्वी पुरवठा करण्याची दक्षता घ्यावी. पुरवठादाराकडुन निविष्ठा प्राप्त झाल्यानंतर **गुणवत्तेची खात्री करुन ८ दिवसांचे आत लाभार्थ्यांस वाटप करण्यात यावे. याची जबाबदारी कृषि विकास अधिकारी यांची राहील.**

जैविक औषधे / रासायनिक खते खरेदी प्रक्रियेकरीता राज्यस्तरावरील दर निश्चीती समितीचे दरानुसार तसेच संचालक (नि.व गु.नि.) यांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करावी. रासायनिक खतांची खरेदी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ यांचेमार्फत करण्यात यावी. बियाणांची खरेदी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ/कृषि विद्यापीठे यांचेकडून करण्यात यावी. निविष्ठांचा पुरवठा हंगामापुर्वी वेळेत करण्यात यावा. निविष्ठा पुरवठा हा १ हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत करण्यात यावा. या घटकाचा लाभ खरीप/रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगामात अथवा एकाच हंगामात देता येईल. मात्र, या बाबी करीता कमाल मर्यादेपेक्षा अधिकचे अनुदान देय राहणार नाही. खरेदी संदर्भात राज्य पातळीवरील दर निश्चिती समिती व कृषि संचालक (नि.व गु.नि.) यांनी दिलेल्या सुचनेनुसार खरेदी करण्यात यावी. शेतक-यांना जास्तीत जास्त माहीती देवून एकात्मिक किड व्यवस्थापनासाठी प्रवृत्त करण्यात यावे.

३. **पिक संरक्षण / शेतीची सुधारित अवजारे**: या बाबी अंतर्गत पीक संरक्षण औजारे / शेतीची सुधारित अवजारे यांचा शासनाने निर्धारीत केलेल्या दराने व शेतक-यांच्या मागणी प्रमाणे पुरवठा करण्यात यावा. शेतक-यांना या बाबींवर लाभ देतांना शेतक-यांस कोणत्या अवजारांची आवश्यकता आहे हे त्यांच्याकडून लेखी घेऊन त्यानुसारच अवजारांचा पुरवठा करावा. या घटकासाठी उच्चतम अनुज्ञेय अनुदान मर्यादा रुपये १०,०००/- पर्यंत लाभ अनुज्ञेय राहील. शासनाने निर्धारित केलेल्या दरानुसार व संचालक (नि.व गु.नि.) यांच्या मार्गदर्शक सुचनांचे अधिन राहून शासन नियुक्त पुरवठादार संस्थांकडून सदर घटकाचा पुरवठा करावा. दरसुचीबाबत दि. २३/११/२०१५ चे शासन निर्णयातील सुचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे. पुरवठादाराकडुन अवजारे प्राप्त झाल्यानंतर **गुणवत्तेची खात्री करुन १५ दिवसांचे आत लाभार्थ्यांस वाटप करण्यात यावे. याची जबाबदारी कृषि विकास अधिकारी यांची राहील.**

४. **बैलजोडी/रेडेजोडी**: बैलजोडी/रेडेजोडी याबाबीकरिता उच्चतम अनुज्ञेय अनुदान मर्यादा रु.३०,०००/- पर्यंत लाभ अनुज्ञेय राहील. बैलजोडी/रेडेजोडी यांचा पुरवठा लाभार्थ्यांच्या मागणीनुसार करावा. बैलजोडीची खरेदी स्थानिक जनावरांच्या बाजारात लाभार्थ्यांच्या संमतीनुसार, पशुवैद्यकीय अधिकारी, जिल्हा कृषि अधिकारी (विघयो), जिल्हा परिषद व कृषि अधिकारी (विघयो) यांच्या उपस्थितीत करावी. बैलजोडी सुदृढ व शेती कामास योग्य असल्याबाबत पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून प्रमाणपत्र घेण्यात यावे. खरेदीचा व्यवहार झाल्यानंतर लाभार्थ्याने बैलजोडीचा विमा उतरविण्यात यावा व निशाणी म्हणून टूटूईंग करुन (गोंदवून) घ्यावे. लाभार्थीचा बैलजोडी समवेत पोस्टकार्ड साईजचा फोटो काढावा व सदर फोटो संबधित अधिकाऱ्यांनी तपासणीचे वेळेस उपलब्ध करुन द्यावा. ज्या लाभार्थ्यांकडे सद्यःस्थितीत स्वतःची बैलजोडी आहे अशा लाभार्थ्यांना बैलजोडी/रेडेजोडीचा लाभ अनुज्ञेय नाही.

४.१. बैल जोडी/रेडे जोडीची मागणी करणा-या शेतक-यांचा लेखी स्वरूपात अर्ज घ्यावा.

४.२. या अर्जासोबत संबधीत शेतक-याकडे सध्या बैलजोडी/रेडेजोडी नसल्याचे **पशु वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र** घ्यावे.

४.३. प्राप्त मागणीनुसार अर्जाची छाननी कृषि अधिकारी (विघयो), पंचायत समिती यांनी करून शिफारसीत अर्ज कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे पाठविण्यात यावेत.

४.४. जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) जि.प. यांनी प्राप्त अर्जाची छाननी करावी. छाननी केल्यानंतर बैलजोडी मंजूरीचे आदेश कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचे स्वाक्षरीने निर्गमित करावेत. बैलजोडी/रेडेजोडी खरेदी केल्यानंतर खरेदीची कागदपत्रे सादर करताच त्याबाबत खात्री करुन उच्चतम अनुदान मर्यादा रक्कम रु.३०,०००/- किंवा त्यापेक्षा खरेदी किंमत कमी असल्यास प्रत्यक्ष खरेदीची रक्कम लाभार्थींच्या बॅन्क खात्यात **आरटीजीएस / एनईएफटी व्दारे** जमा करावी.

५. **बैलगाडीः** बैलगाडी या घटकांसाठी उच्चतम अनुज्ञेय अनुदान मर्यादा रु.१५,०००/- पर्यंत लाभ अनुज्ञेय राहील. बैलगाडीची खरेदी परिशिष्ट दोन मधील मुद्या (ब) नुसार शासनाने निर्धारित केलेल्या दराने व शासननियुक्त पुरवठा संस्थांकडून करण्यात यावी. अशा बैलगाडीच्या दर्शनी भागावर योजनेचे नाव व पुरवठा केल्याचे वर्ष लिहीलेले ३X२ इंच आकाराचे पत्र्याचे ठळक लेबल लावावे अथवा लाकुड असलेल्या भागात कोरुन घ्यावे. याबाबत संचालक (नि.व गु.नि.) यांच्या मार्गदर्शक सुचनांचे अधिन राहून शासन नियुक्त पुरवठा संस्थांकडून पुरवठा करावा. पुरवठादाराकडुन बैलगाडी प्राप्त झाल्यानंतर **गुणवत्तेची खात्री करुन १५ दिवसांचे आत लाभार्थ्यांस वाटप करण्यात यावे**. याची जबाबदारी कृषि विकास अधिकारी यांची राहील.

६. **जुनी विहिर दुरुस्ती :** या बाबी अंतर्गत नाबार्डने निर्धारित केलेल्या तांत्रिक निकषांच्या आधारे उच्चतम अनुज्ञेय अनुदान मर्यादा रु.३०,०००/- पर्यंत लाभ अनुज्ञेय राहील. त्यापेक्षा अधिक रक्कम लागल्यास लाभार्थीने स्वतः उभी करावयाची आहे. लाभार्थ्यांनी जुन्या विहिरींची कामें करतांना त्याचे अंदाजपत्रक तयार करुन उप अभियंत्याकडुन तांत्रिक मान्यता घ्यावी व कृषि अधिकारी (विघयो) पंचायत समिती यांनी झालेल्या कामाचे मोजमाप करुन खर्चाचे प्रमाणातच अनुदानाचा लाभ देण्यात यावा. याबाबतच्या निकषात नाबार्डकडुन वेळोवेळी जे तांत्रिक बदल होतील ते तात्काळ योजनेकरीता लागु राहतील. या घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना इनवेल बोअरिंग घटकाचा लाभ अनुज्ञेय नाही. जुनी विहीर दुरुस्तीचे काम वेळेत पुर्ण करणेबाबत लाभार्थ्याकडुन बंधपत्र घेण्यात यावे तसेच क्षेत्रीय यंत्रणा व कृषि विकास अधिकारी यांनी त्याचे सनियंत्रण करावे. लाभाची रक्कम लाभार्थींच्या बॅन्क खात्यात **आरटीजीएस / एनईएफटी व्दारे** जमा करावी.

७. **इनवेल बोअरींग :** या बाबीसाठी नाबार्डने निर्धारित केलेल्या खर्चाच्या प्रमाणकांप्रमाणे उच्चतम अनुज्ञेय अनुदान मर्यादा रु.२०,०००/- पर्यंत लाभ अनुज्ञेय राहील. इनवेल बोअरींगचे काम करतांना खर्चाचे अंदाजपत्रक व तांत्रिक निकषानुसार ठिकाणाची योग्यता (Feasibility Report) याबाबत भुजल सर्वेक्षण यंत्रणेकडून प्राप्त करुन घ्यावा. कृषि अधिकारी (विघयो), पंयाचत समिती यांनी झालेल्या कामाची मोजमापे घेऊन प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाणात अनुदानाचा लाभ देणेंत यावा. या घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना जुनी विहिर दुरुस्तीचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. लाभाची रक्कम लाभार्थींच्या बॅन्क खात्यात **आरटीजीएस / एनईएफटी व्दारे** जमा करावी.

८. **पाईप लाईनः** या बाबी अंतर्गत लाभार्थीस जास्तीत जास्त ३०० मीटरपर्यंत लाभ देता येईल. यासाठी नाबार्डने निर्धारित केलेल्या खर्चाच्या प्रमाणकाच्या १०० टक्के अनुदान देय राहील. याकरीता रु.२०,०००/- च्या मर्यादेत अनुदान उपलब्ध राहिल. शेतकऱ्यांना योग्य गुणवत्तेचे पाईप उपलब्ध व्हावेत म्हणून आयएसआय मार्क असलेल्याच शेतकऱ्यांच्या मागणीनुसार एचडीपीई पाईप किंवा पीव्हीसी पाईपची खरेदी करण्यात यावी. यामध्ये पाईपचा प्रत्यक्ष किंमत किंवा रु. २००००/- यापैकी जे कमी असेल तेवढेच अनुदान देय राहील. पाईपची खरेदी परिशिष्ट दोन मधील मुद्या (ब) नुसार करण्यात यावी. याबाबत शासनाने निर्धारित केलेल्या दरानुसार / संचालक (नि.व गु.नि.) यांच्या मार्गदर्शक सुचनांचे अधिन राहून शासन नियुक्त पुरवठादार संस्थांकडूनच पुरवठा करावा.

९. **पंपसंचः** विद्युत पंपसंच तसेच ऑईल ईंजिन करीता रक्कम रु. २००००/- च्या मर्यादेत अनुदान उपलब्ध राहील. सदर निकषाप्रमाणे १०० टक्के अनुदान देय राहील. या बाबी अंतर्गत विद्युत पंपसंच त्याचप्रमाणे ऑईल ईंजिन यांचा लाभ देता येईल. यामध्ये प्रत्यक्ष किंमत किंवा रु. २००००/- यापैकी जे कमी असेल तेवढेच अनुदान देय राहील. याचा लाभ सिंचन स्त्रोत उपलब्ध असणा-या शेतक-यांना द्यावा. पंपसंच खरेदी परिशिष्ट दोन मधील मुद्या (ब) नुसार करण्यात यावी. याबाबत संचालक (नि.व गु.नि.) यांच्या मार्गदर्शक सुचनांचे अधिन राहून शासन नियुक्त पुरवठादार संस्थांकडून पुरवठा करावा. सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता व विद्युत कनेक्शन लाभधारकाकडे असल्याची खात्री कृषि अधिकारी, पंचायत समिती यांनी करावी व त्यानुसार विद्युत पंपाचा लाभ शेतक-यांना देण्यात यावा.

१०. **नवीन विहीर खोदणेः** या घटकासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (मनरेगा) योजनेअंतर्गत सिंचन विहीर योजनेला जे तांत्रिक निकष वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील, त्या निकषांप्रमाणे राहील. सदरचा कार्यक्रम राबविताना महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत जवाहर विहीर कार्यक्रमाच्या सुधारीत मापदंडानुसार (शा.नि.क्र.रोहयो-२००७/प्र.क्र.१७९/रोहयो-१ मंत्रालय मुंबई-३२ दि.१० एप्रिल २००८) भुस्तरानिहाय नवीन विहीरी करीता खर्चाचे मापदंड लागु

राहतील. त्यानुसार भूस्तरप्रकारानुरुप लाभार्थीस रु. ७०,०००/- ते रु.१,००,०००/- मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील. तसेच शासन पत्र क्र विघयो/१००२/प्रक्र ७३/भाग १/२१अे, दि. १३ मार्च २००३ अन्वये या योजनेअंतर्गत किमान क्षेत्राची अट ०.४० हेक्टर निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. याबाबत पूर्ण लाभ देताना पूर्णत्वाचे प्रमाणपत्र संबंधीत यंत्रणेकडून घ्यावे.

अ. क्र.	भुस्तराचा प्रकार	जिल्हे	प्रति नवीन विहिर अनुज्ञेय अनुदान मर्यादा (रु.)
१	वालुकामय व मेटामार्फीक (रुपांतरीत) विदर्भातील भाग आणि तापी पुर्णा खोऱ्यातील भाग	गडचिरोली, भंडारा, गोंदिया,चंद्रपूर, नागपूर, अकोला, वाशिम, अमरावती, बुलढाणा, धुळे,नंदूरबार जळगांव, कोल्हापूर, सिंधूदुर्ग, रत्नागिरी	१,००,०००/-
२	दख्खन पठारचा प्रदेश	नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला,वाशिम, बुलढाणा, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, अहमदनगर, नाशिक,नंदुरबार, धुळे, जळगांव, उसमानाबाद, औरंगाबाद, लातूर, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड,	१,००,०००/-
३	जांभ्या खडकाचा प्रदेश (किनारपट्टीचा भाग)	ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधूदुर्ग	७०,०००/-

वरील तक्त्यात दर्शविल्यानुसार नवीन विहीर घटकाकरीता खर्चाचे मापदंड असून भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील. नवीन विहीर या घटका खाली लाभार्थीस अनुदान देतांना भूस्तरीय रचना व अंदाजपत्रकातील घटकानुसार झालेल्या प्रत्यक्ष कामाचे मोजमापानुसार अनुदान अदा करावे. प्रत्यक्षात झालेल्या खर्चाप्रमाणे अनुदान उच्चतम मर्यादेनुसार रक्कम शिल्लक राहत राहील्यास त्यामधुन अन्य बाबींचा लाभ लाभार्थीस अनुज्ञेय नाही. ''नवीन विहीर'' या घटकाचा लाभ घेणा-या लाभार्थ्यांस अन्य कोणत्याही घटकाचा लाभ अनुज्ञेय नाही. लाभार्थीस दोन आर्थिक वर्षात पूर्ण लाभ देण्याचे दृष्टीने विहीरीचे काम सदर कालावधीत पूर्ण करुन घेण्याबाबत संबंधीतांना स्पष्टपणे सुचना लेखी द्याव्यात व संबंधीत अधिका-यांनी त्याबाबत दक्षता घ्यावी.

नवीन विहीर या बाबीची १०० टक्के तपासणी तसेच विहीरी वेळेत पुर्ण केल्या जातात किंवा नाही याची दरमहा क्षेत्रीय तपासणी करुन कृषि विकास अधिकारी यांनी आढावा घ्यावा. **नवीन विहीरीचे काम निर्धारित वेळेत पुर्ण करणेबाबत लाभार्थ्याकडुन बंधपत्र घेण्यात यावे. लाभार्थ्यास विहीत मुदत संपल्यानंतर पुन्हा अनुदान मिळणार नाही याबाबतची स्पष्ट जाणीव पंचायत समितीचे कृषि अधिकारी यांनी लाभार्थ्यांना दयावी. विहीत मुदतीत विहीरीचे काम पुर्ण करुन घेणेबाबत कृषि अधिकारी पंचायत समिती, जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) व कृषि विकास अधिकारी यांनी नियमित आढावा घेवून कामे पुर्ण करुन घ्यावीत. विहीरीचे काम सुरु करण्यापुर्वी कृषि अधिकारी, पंचायत समिती यांनी क्षेत्र पहाणी करुन विहीरीची आखणी करुन दयावी तसेच लाभार्थ्याने मागणी केलेल्या व मंजूर क्षेत्रातच विहीर खोदाई करणे गरजेचे आहे त्यासाठी विहीर खोदाई काम सुरु करण्यापुर्वी कृषि अधिकारी यांनी तपासणी करुन विहीरीची आखणी करुन दयावी.**

विहीरीचे काम सुरु केल्यानंतर दर दहा दिवसांनी कृषि अधिकारी, पंचायत समिती यांनी कामास भेट देवून पुर्ण झालेल्या कामाचे देय अनुदान पुढील १५ दिवसांचे आत लाभार्थीच्या बँक खात्यात आरटिजीएस / एनईएफटीव्दारे जमा करावे. याबाबत जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांनी नियमित आढावा घ्यावा. शेतकऱ्यांना वेळेत अनुदान अदा करुन कामे विहीत मुदतीत पुर्ण करुन घ्यावीत. शेतकऱ्यांकडुन कामे अपुर्ण रहात असल्यास त्याबाबतचे अभिलेख तयार करावेत.

११. **शेततळे:** मृद व जलसंधारण विभागाच्या निकषांनुसार व रोजगार हमी योजनेच्या मापदंडाप्रमाणे उच्चतम अनुज्ञेय अनुदान मर्यादा रुपये ३५,०००/- पर्यंत लाभ अनुज्ञेय राहील. लाभाची रक्कम लाभार्थीच्या बॅन्क खात्यात **आरटीजीएस / एनईएफटी व्दारे** जमा करावी.

१२. **परसबाग : अनुसूचित जाती व नवबौध्द शेतकऱ्यांना वेगवेगळया प्रकारची भाजीपाला उदा. भेंडी, गवार, चवळी, दुधी भोपळा, डांगर भोपळा, शेवगा, काकडी, दोडका इ. बियाणांचे किट महाबीज / एनएससी / कृषि विद्यापीठांकडुन खरेदी करुन लाभार्थीस हंगामापुर्वी देण्यात यावा. यामध्ये पपई, कढीपत्ता, वांगी, टोमॅटो यासारख्या पिकांच्या रोपाचा पुरवठा शासकीय व कृषि विद्यापीठाच्या प्रक्षेत्रातुन करण्यात यावा.**

शेतक-यांना परसबागेसाठी प्रति लाभार्थी रुपये २००/- प्रमाणे उच्चतम अनुज्ञेय मर्यादेत लाभ अनुज्ञेय राहील.

१३. **तुषार/ठिबक सिंचन संच पुरवठाः** संचालक, फलोत्पादन यांचेकडुन तुषार व ठिबक सिंचनाबाबत योजनेच्या मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येतात. शेतक-यांना सिंचन क्षेत्रात वाढ करण्यासाठी तुषार/ठिबक सिंचन संचाचा पुरवठा उच्चतम अनुज्ञेय अनुदान मर्यादेत रु.२५०००/- प्रती हेक्टर प्रमाणे लाभ अनुज्ञेय राहील. एकुण अनुदानाची उच्चतम मर्यादा रु. २५०००/- इतकीच राहील. संचाची खरेदी कृषि विभागाच्या मान्यता प्राप्त उत्पादकांकडून करावी व संचाचा दर्जा आयएसआय प्रमाणीत असावा. संचाची तपासणी कृषि अधिका-यांनी (विघयो) केल्यानंतर अनुदान अनुज्ञेय राहील. लाभाची रक्कम लाभार्थींच्या बॅन्क खात्यात **आरटीजीएस / एनईएफटी व्दारे** जमा करावी. याबाबीचा लाभ जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांचेमार्फत दिला नसल्याचे कृषि विभागाच्या सक्षम अधिकाऱ्याकडुन प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.

१४. **ताडपत्री :** अनुसुचित जातीतील शेतक-यांना धान्य वाळविण्यासाठी व पावसापासून धान्य संरक्षणासाठी आयएसआय मार्क ताडपत्रीचा पुरवठा उच्चतम अनुज्ञेय अनुदान मर्यादा रुपये १०,०००/- पर्यंत करावा. पुरवठा केंद्र/राज्य शासनाच्या वैध दरकरारानुसार करावा. ताडपत्रीची मागणी प्राधिकृत दरकरार केलेल्या संस्थेकडेच नोंदवावी. ताडपत्रीच्या गुणनियंत्रणाबाबत भारतीय मानांकन संस्थेच्या आयएसआय मानकांनुसार तपासणीची कार्यवाही संबंधीत कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद व पुरवठा संस्थांनी करावी.

(ब) कृषि औजारे मागणी व पुरवठा गुणनियंत्रणः

कृषि संचालक, (निविष्ठा व गुण नियंत्रण) यांनी विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांतर्गत अनुदानावर पुरविण्यात येणाऱ्या कृषि औजारांचे बाबत खरेदी प्रक्रीया, औजारांची स्पेसीफिकेशन्स व गुणवत्ता तपासणी इत्यादी बाबत वेळोवेळी निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यक्रमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी. मंजूर आर्थिक/भौतिक मर्यादेपेक्षा जास्त व प्रत्यक्ष गरजेपेक्षा अधिक व शेतकऱ्यांची मागणी नसलेल्या औजारांची कोणत्याही परिस्थितीत मागणी नोंदवू नये. पुरवठादार यंत्रणेकडुन औजारे / साहित्या पुरवठा झाल्यानंतर **गुणवत्तेची खात्री करुन १५ दिवसाचे आत लाभार्थींना वाटप करण्यात यावीत**. मागणीनुसार पुरवठा केलेली कोणतीही औजारे पडून राहणार नाहीत, याची सर्वस्वी जबाबदारी मागणी नोंदविणाऱ्या अधिकाऱ्यांची राहील. औजारे विनावाटप पडून राहील्याचे आढळून आल्यास मागणी नोदंविणाऱ्या अधिकाऱ्यास जबाबदार धरुन शिल्लक राहिलेल्या औजारांच्या किंमती एवढ्या रकमेची एकरकमी वसुली करण्यात येईल व संबंधितांविरुध्द प्रशासकीय कारवाई प्रस्तावित केली जाईल. शासनाने दरनिश्चिती केल्यावर शासन निर्णय व संचालक (नि. व गु.नि.) यांचेकडून निर्गमित होणाऱ्या मार्गदर्शक सूचना जशाच्या तशा लागू राहतील.

कृषि आयुक्तालयाचे परिपत्रक.जा.क्र.कृषि/१६ सीबीसेल/लाभार्थी/४७०/२०१२, दि.१२/०३/२०१२ नुसार ज्या प्रकरणी अनुदान वजा जाता लाभार्थी हिश्श्याची रक्कम वसूल करावयाची आहे तेथे ती संबंधितांकडून डी.डी. स्वरुपात वसुल करुन या रकमेची लाभार्थ्यांना शासकीय जमा पोचपावती देण्यात यावी. याप्रमाणे कार्यवाही न केल्यास, ती वित्तीय अनियमीतता समजून संबधीत मागणी नोंदविणा-या अधिका-या विरुध्द प्रशासकीय कारवाई केली जाईल. लाभार्थी हिश्यासह पुरवठा संस्थेची देयके वेळेत अदा करणे ही मागणी नोंदविण्या-या अधिका-याची सर्वस्वी जबाबदारी राहील.

अनुदानाची द्विरुक्तीः उपरोक्त योजनेंतर्गत एकूण १४ बाबींसाठी एकदाच अनुदान अनुज्ञेय आहे. लाभार्थीस एकाच घटकासाठी दोन योजनेमधून अनुदान दिले जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

संचालक
(विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रपत्र – १ (अ)

अनुसूचित जाती उपयोजना (विघयो) सन २०१५-१६ मधील शिल्लक रकमेच्या खर्चाचा अहवाल

जिल्हा – अहवाल कालावधी माहे , २०१६ अखेर

सन २०१५-१६ मध्ये निवडलेले एकूण लाभार्थी संख्या -महिला----, अपंग-----, इतर ------ एकुण ----- सन २०१५-१६ मध्ये एकुण प्राप्त निधी -

सन २०१५-१६ मध्ये निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी पुर्ण लाभ दिलेल्या लाभार्थींची संख्या – सन २०१५-१६ मधील एकुण खर्च –

सन २०१५-१६ मध्ये निवडलेल्या परंतु अपुर्ण लाभ दिलेल्या लाभार्थीची संख्या – सन २०१५-१६ मधील शिल्लक निधी रु.-----

अ. क्र.	बाब	लक्षांक						साध्य					
		सन २०१५-१६ चे उर्वरित लाभार्थी		सन २०१६-१७ चे नवीन लाभार्थी		एकूण		सन २०१५-१६ चे उर्वरित लाभार्थी		सन २०१६-१७ चे नवीन लाभार्थी		एकूण	
		घटकांची संख्या	त्यासाठी लागणारी रक्कम	घटकांची संख्या	त्यासाठी लागणारी रक्कम	घटक (रकाना ३+५)	रक्कम (रकाना ४+६)	घटकांची संख्या	त्यासाठी लागणारी रक्कम	घटकांची संख्या	त्यासाठी लागणारी रक्कम	घटक (रकाना ९+११)	रक्कम (रकाना १०+१२)
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४
१	जमीन धारणा												
२	निविष्ठा वाटप												
३	कृषि सुधारित औजारे												
४	बैलजोडी												
५	बैलगाडी												
६	इनवेल बोरींग												
७	जुनी विहीर दुरुस्ती												
८	पाईपलाईन												
९	पंपसंच												
१०	नविन विहीर												
११	शेततळे												
१२	परसबाग कार्यक्रम												
१३	तुषार/ठिबक सिंचन												
१४	ताडपत्री												
	अभिकरण शुल्क												
घटकांची एकुण													

प्रपत्र — १ (ब)

अनुसूचित जाती उपयोजना (विघयो) सन २०१६-१७ मधील निधीतून केलेल्या खर्चाचा मासिक प्रगती अहवाल

जिल्हा — अहवाल कालावधी माहे , २०१६ अखेर

सन २०१६-१७ मध्ये निवडलेले एकूण नवीन लाभार्थी संख्या महिला----, अपंग----, इतर ---- एकुण -----

सन २०१६-१७ मध्ये प्राप्त निधी --------- सन २०१५-१६ मधील उर्वरित लाभ दयावयाच्या लाभार्थींची संख्या

अ. क्र.	बाब	लक्षांक						साध्य					
		सन २०१५-१६ चे उर्वरित लाभार्थी		सन २०१६-१७ चे नवीन लाभार्थी		एकूण		सन २०१५-१६ चे उर्वरित लाभार्थी		सन २०१६-१७ चे नवीन लाभार्थी		एकूण	
		घटकांची संख्या	त्यासाठी लागणारी रक्कम	घटकांची संख्या	त्यासाठी लागणारी रक्कम	घटक (रकाना ३+५)	रक्कम (रकाना ४+६)	घटकांची संख्या	त्यासाठी लागणारी रक्कम	घटकांची संख्या	त्यासाठी लागणारी रक्कम	घटक (रकाना ९+११)	रक्कम (रकाना १०+१२)
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४
१	जमीन धारणा												
२	निविष्ठा वाटप												
३	कृषि सुधारित औजारे												
४	बैलजोडी												
५	बैलगाडी												
६	इनवेल बोरींग												
७	जुनी विहीर दुरुस्ती												
८	पाईपलाईन												
९	पंपसंच												
१०	नविन विहीर												
११	शेततळे												
१२	परसबाग कार्यक्रम												
१३	तुषार/ठिबक सिंचन												
१४	ताडपत्री												
	अभिकरण शुल्क												
घटकांची एकुण													

प्रपत्र – २ (अ)

अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकासाठी निविष्ठा पुरवठा, पिक संरक्षण / शेतीची सुधारित औजारे, बैलगाडी, पाईप लाईन, पंपसंच, ताडपत्री व परसबाग या बाबीसाठी दिलेल्या लाभाबाबत तपासणीचे प्रपत्र

१. तपासणी अधिकाऱ्याचे नाव व पदनाम
२. तपासणी दिनांक
३. तपासणी केलेल्या लाभार्थीचे नाव व पत्ता
४. लाभार्थीने मागणी केलेल्या बाबी एकूण
५. दिलेल्या लाभाचा तपशील व रक्कम
६. उत्पादकाचे नाव
७. वाटप झाल्याचा दिनांक
८. तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय

तपासणी दिनांक तपासणी अधिकाऱ्याची स्वाक्षरी

प्रपत्र – २ (ब)

अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द शेतकऱ्यांना जमीन सुधारणा, बैलजोडी, जुनी विहीर दुरुस्ती, इनवेल बोअरींग, शेततळे व तुषार / ठिबक सिंचन संच या बाबीसाठी दिलेल्या लाभाबाबत तपासणीचे प्रपत्र

१. तपासणी अधिकाऱ्याचे नाव व पदनाम
२. तपासणी दिनांक
३. तपासणी केलेल्या लाभार्थीचे नाव व पत्ता
४. लाभार्थीने मागणी केलेल्या बाबी एकूण
५. दिलेल्या लाभाचा तपशील व रक्कम
६. रक्कम कोणत्याप्रकारे अदा केली (आरटिजीएस / एनईएफटी)
७. लाभार्थ्यांचा बँक खाते तपशील (बँकेचे नाव व खाते क्रमांक)
८. काम पुर्ण झाल्याचा दिनांक
९. खरेदी दिनांक (बैलजोडीचा लाभ दिला असल्यास)
१०. तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय

तपासणी दिनांक तपासणी अधिकाऱ्याची स्वाक्षरी

प्रपत्र – २ (क)

अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द शेतकऱ्यांना नवीन विहीर या बाबीसाठी दिलेल्या लाभाबाबत तपासणीचे प्रपत्र

१. तपासणी अधिकाऱ्याचे नाव व पदनाम
२. तपासणी दिनांक
३. तपासणी केलेल्या लाभार्थीचे नाव व पत्ता
४. नवीन विहीर घेतलेल्या क्षेत्राचा सर्वे नंबर व क्षेत्र
५. नवीन विहीरीचा अंदाजपत्रकीय खर्च
६. तांत्रिक मान्यता दिनांक व रक्कम
७. तपासणीच्या दिनांकास विहीरीच्या कामाची स्थिती
८. तपासणीच्या दिनांकास विहीरीच्या पुर्ण केलेल्या कामाची अंदाजीत रक्कम
९. पैकी लाभार्थीस दिलेले अनुदान
१०. रक्कम कोणत्याप्रकारे अदा केली (आरटिजीएस / एनईएफटी)
११. लाभार्थ्यांचा बँक खाते तपशील (बँकेचे नाव व खाते क्रमांक)
१२. तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय

तपासणी दिनांक तपासणी अधिकाऱ्याची स्वाक्षरी

प्रपत्र –२ (ड)

सन २०१६-१७ अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत लाभार्थी तपासणीचा मासीक अहवाल

विभाग ----------जिल्हा ---------- माहे ---------- अखेर

अ. क्र.	तपासणी अधिका-याचे नाव	पदनाम	लाभ दिलेल्या लाभार्थींची संख्या		तपासणी केलेल्या लाभार्थींची संख्या			शेरा
			महिन्यात	दि. १/४/१६ पासून	महिन्यात	दि. १/४/१६ पासून	तपासणीची टक्केवारी	
१	२	३	४	५	६	७	८	११

दिनांक :-

तपासणी अधिका-याची स्वाक्षरी

प्रपत्र ३

अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत लाभार्थीने करावयाच्या अर्जाचा नमुना तसेच विविध अनुषंगीक प्रमाणपत्रांचे नमुने

अनुक्रमणिका

अनुसूचित जाती उपयोजनेचा लाभ घेण्यासाठी लागणारी कागदपत्रे खालीलप्रमाणे

अ.क्र.	बाब	पान क्र.	शेरा
१.	स्थळ पहाणी अहवाल (कार्यालयीन)		
२.	विहीत नमुन्यातील अर्ज		
३.	शेतकऱ्याची वैयक्तीक माहिती		
४.	साहित्य / औजारे मागणीपत्र		
५.	जातीचे प्रमाणपत्र (अ.जा.)		
६.	उत्पन्नाचे प्रमाणपत्र / बीपीएल प्रमाणपत्र		
७.	रेशनकार्ड (शिधापत्रिका)		
८.	रहिवाशी प्रमाणपत्र		
९.	८ अ उतारा		
१०.	७ / १२ उतारा		
११.	ग्रामसभा ठराव प्रत		
१२.	कुटुंब जमीन धारणा प्रमाणपत्र		
१३.	पशुधन विकास अधिकाऱ्याचे बैलजोडी नसल्याचे प्रमाणपत्र		
१४.	अन्य योजनेतुन विहीर घेतली नसल्याचे प्रमाणपत्र		
१५.	बँक खाते प्रथम पान झेरॉक्स प्रत		
१६.	आधारकार्ड प्रत (ऐच्छिक)		

वर नमुद केलेली सर्व कागदपत्रे (मुळ एक प्रतीत व झेरॉक्स एक प्रतीत) याप्रमाणे सादर करीत आहे.

आपला विश्वासु

सही : -

(नाव :-)

अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत लाभार्थी निवड होणेकामी अर्ज

दिनांक :

प्रति,
मा. कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद, ----------

मार्फत
मा. गट विकास अधिकारी
पंचायत समिती ----------

विषय : अनुसूचित जाती उपयोजना सन २०१६-१७ मध्ये लाभार्थी म्हणुन निवड होणेबाबत

अर्जदार : श्री./श्रीमती.
राहणार :---------- तालुका : ---------- जि. : ----------

महोदय,

मी श्री./श्रीमती ---------- रा. ---------- ता. ---------- जि. ---------- येथील रहिवाशी असुन ---------- या जातीचा आहे. मौजे ---------- ता. ---------- येथे गट क्र. ---------- मध्ये माझ्या नावावर ----------एवढे क्षेत्र आहे. माझे सन २०१५-१६ चे वार्षिक उत्पन्न रु. ---------- एवढे आहे. सदर योजनेत मी किंवा माझ्या कुटुंबीयांनी यापुवी लाभ घेतलेला नाही.

सदर योजनेतुन मिळणाऱ्या अनुदानाचा उपयोग मी माझी शेतीसुधारणेसाठी करील. त्याचा दुरुपयोग करणार नाही. सदर योजनेतुन मिळणाऱ्या अनुदानाचा मी दुरुपयोग केल्याचे शासनाचे निदर्शनास आल्यास शासनाचे नियमाप्रमाणे मी कार्यवाहीस पात्र राहील. सदर योजनेच्या सर्व अटी व नियम मला मान्य आहेत.

तरी सन २०१६-१७ या वर्षात माझी लाभार्थी म्हणुन निवड होणेस विनंती आहे.

सोबत सविस्तर प्रस्ताव जोडुन २ प्रतित सादर करीत आहे.

आपला विश्वासु

सही : -

(नाव :-)

अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत शेतकऱ्यांची वैयक्तिक माहीती

१. शेतकऱ्याचे संपुर्ण नाव :

२. गाव व तालुका :

३. जात / जमात :

४. दारिद्रय रेषेखालील आहे काय ? असल्यास क्रमांक

५. एकुण वार्षिक उत्पन्न रुपये

६. कुटुंबाची माहिती (एकुण व्यक्ती) मोठे लहान स्त्रीया पुरुष एकुण

७. नावे असलेले एकुण क्षेत्र (८ अ प्रमाणे) गट नं. क्षेत्र हेक्टर आर

८. आधार कार्ड क्रमांक

९. यापुर्वी कुटुंबात या योजनेचा लाभ घेण्यात आला आहे काय ? असल्यास

अ.क्र.	लाभार्थीचे नाव	वर्ष	लाभ घेतलेल्या बाबी	अनुदान रक्कम
१				
२				

१०. सिंचन सुविधा उपलब्ध आहे काय ? असल्यास कोणती विहीर / पाटपाणी /इतर

विहीर असल्यास - विहीरीचा गट नंबर

विहीर स्वतंत्र आहे की सामायीक

विहीरीची खोली - व्यास विहीरीती पाणीपातळी

विहीरीची परिस्थिती- हंगामी / बारमाही

विहीर कोणत्या योजनेतून घेण्यात आली आहे / कि स्वखर्चातुन

विद्युत कनेक्शन प्राप्त आहे काय ?

विहीर बांधकाम पुर्ण आहे काय ?

पाणी उपसा याचे साधन काय आहे विद्युतपंप / ऑईल इंजिन

११. जमीनीची प्रत (मध्यम / भारी / हलकी ----------)

लागवडीखालील क्षेत्र –

पडीक क्षेत्र –

१२. शेतकऱ्याकडील उपलब्ध साधनांचा तपशील

२. बैलजोडी - आहे / नाही २. बैलगाडी - आहे / नाही

४. पाईपलाईन - आहे / नाही ४. विद्युतपंप / ऑईल इंजिन - आहे / नाही

६. सुधारित शेती औजारे - आहे / नाही ६. ठिबक संच / तुषारसंच - आहे / नाही

८. विहीर दुरुस्ती आवश्यकता - आहे / नाही ८. इतर -

१३. योजनेतुन मागणी केलेली सुधारित औजारे व इतर साहित्य

अ ----------

ब ----------

क ----------

ड ----------

१४. बैलजोडी हवी असल्यास वैरण / कडबा / घास उपलब्ध आहे काय ?

१५. जनावरे बांधण्यास जागा उपलब्ध आहे काय ?

१६. पिकाबाबत माहीती १. खरीप हंगामात घेण्यात येणारी पिके ----------

२. रब्बी हंगामात घेण्यात येणारी पिके ----------

३. उन्हाळी हंगामात घेण्यात येणारी पिके ----------

१७. इतर ----------

मी याव्दारे निवेदित करतो की, उपरोक्त दिलेली सर्व माहीती खरी आहे. यापुर्वी विशेष घटक योजना / टिएसपी / ओटिएसपी योजनेचा मी किंवा माझ्या कुटुंबीयांनी लाभ घेतलेला नाही. तसे आढळुन आल्यास मी या योजनेत सहभाग घेण्यास पात्र होणार नाही याची मला जाणीव आहे.

सही / अंगठा

शेतकऱ्याचे नाव

अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत लाभार्थीची औजारे / साहित्य मागणी अर्ज

प्रति,
मा. गट विकास अधिकारी,
पंचायत समिती ----------

१. लाभधारकाचे नाव :---------- फोन नंबर ----------
२. गाव : ---------- पो. ---------- ता. ---------- जि. ----------
३. जात : ---------- ४. एकुण जमीन (८अ प्रमाणे हेक्टर) : ----------

मला विशेष घटक योजना / टिएसपी योजना / ओटिएसपी योजना अंतर्गत खालील बाबींची आवश्यकता आहे **(नवीन विहीर घेतल्यास अन्य बाबी नाहीत)**

अ. क्र.	बाब	अनुदान मर्यादा	पाहिजे	नाही	एकत्रित मर्यादा
अ					
१.	जमीन सुधारणा	रु.४०,०००/-			रु. ५०,०००/-
२.	प्रात्यक्षिकासाठी निविष्ठा (बियाणे, खते व औषधे)	रु.५,०००/-			
३.	पीक संरक्षण/शेतीची सुधारित अवजारे	रु.१०,०००/-			
४.	बैलजोडी/ रेडेजोडी	रु. ३०,०००/-			
५.	बैलगाडी	रु. १५,०००/-			
६.	जुनी विहिर दुरुस्ती (लघु पाटबंधारे खात्याकडुन अंदाजपत्रक जरुरीचे)	रु.३०,०००/-			
७.	इनवेल बोअरिंग	रु.२०,०००/-			
८.	पाईप लाईन	३०० मीटरपर्यंत रु.२०,०००/-			
९.	पंपसंच (७/१२ वर विहीरीची नोंद आवश्यक आहे त्याशिवाय मागणी नोंदविली जाणार नाही)	रु.२०,०००/-			
१०.	शेततळे	रु.३५,०००/-			
११.	परसबाग कार्यक्रम	रु.२००/-			
१२.	तुषार/ ठिबक सिंचन संच	रु. २५,०००/-			
१३.	ताडपत्री	रु. १०,०००/-			
ब					
१४.	नवीन विहिर	रु. ७०,०००/- ते रु.१,००,०००/-			रु. १,००,०००/-

यापुर्वी मी विशेष घटक योजना योजनेचा किंवा शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेतुन वरील बाबींचा लाभ घेतलेला नाही. तसे निर्दशनास आल्यास माझा अर्ज रद्द व्हावा, हि विनंती. तसेच मी मागणी केलेल्या साहित्य / औजारांची रक्कम मर्यादेपेक्षा जास्त झाल्यस त्याचा लोकवाटा भरणा करुनचे साहित्याची उचल करेन. मागणी केलेल्या साहित्या व्यतिरिक्त अन्य काहीही मिळणार नाही याची मला जाणीव करुन देण्यात आली आहे. दर करारात नमुद कंपनीचे साहित्य मला मान्य राहील. याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही.

आपला विश्वासु

सही : -

(नाव :-)

प्रतिज्ञापत्र

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, या अर्जासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असुन ती मी स्वतः उपलब्ध करुन आणलेली आहेत. या कागदपत्रात काहीही खाडाखोड केलेली नाही. यात काही खोटे आढळल्यास भा.द.वि. ४२०, १९९ व २०० प्रमाणे व नियमानुसार योग्य त्या शिक्षेस पात्र राहील याची मला जाणीव आहे.

आपला विश्वासु

सही : -

(नाव :-)

टिप : अर्जदार शेतकऱ्याने अर्जासोबत खालीलप्रमाणे आवश्यक कागदपत्रे जोडण्यात यावीत,

१) जातीचे प्रमाणपत्र,
२) उत्पन्नाचे प्रमाणपत्र किंवा बीपीएल कार्डाची झेरॉक्स ,
३) रेशनकार्ड झेरॉक्स,
४) सरपंच व ग्रामसेवक /ग्राम विकास अधिकारी यांनी दिलेले रहीवाशी प्रमाणपत्र
५) ८ अ उतारा,
६) ७/१२ उतारा
७) संयुक्त खातेदार असल्यास गाव कामगार तलाठी यांचे अर्जदाराचे कुटुंबात एकुण जमीन धारणेचे प्रमाणपत्र,
८) विहीर नसल्याबाबत गाव कामगार तलाठी यांचे प्रमाणपत्र,
९) बैलजोडी नसल्याबाबत पशुधन विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र,
१०) मतदान ओळखपत्राची झेरॉक्स

प्रमाणपत्रांचे नमुने

रहिवाशी प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, श्री./श्रीमती ---------- रा. ---------- तालुका ----------, जिल्हा ---------- हे/या येथील रहिवाशी असुन त्यांचे नावे या गावात शिधापत्रिक / मतदान ओळखपत्र आहे.

सबब हे प्रमाणपत्र त्यांचे मागणीवरुन देण्यात येत आहे.

दिनांक :

सरपंच
ग्रामपंचायत

ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी
ग्रामपंचायत

संयुक्त खातेदार असल्यास कुटुंबात एकुण जमीन धारणेचे प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, श्री./श्रीमती ---------- रा. ---------- तालुका ----------, जिल्हा ---------- हे/या येथील रहिवाशी असुन त्यांचे कुटुंबात एकुण ------- हेक्टर ------ आर क्षेत्राची जमीन आहे. सदर नोंद गाव कामगार तलाठी यांचेकडील मुळ कागदपत्रावरुन तपासुन दिली असुन ती सत्य आहे.

सबब हे प्रमाणपत्र त्यांचे मागणीवरुन देण्यात येत आहे.

दिनांक :

गाव कामगार तलाठी
सजा

विहीर नसल्याचे प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, श्री./श्रीमती ---------- रा. ---------- तालुका ----------, जिल्हा ---------- हे/या येथील रहिवाशी असुन त्यांचे कुटुंबात एकुण ------- हेक्टर ------ आर क्षेत्राची जमीन आहे. सदरील व्यक्तीच्या कोणत्याही गट नंबरमध्ये विहीर / सामायीक विहीरीत हिस्सा / बोअर नाही. सबब प्रमाणपत्र या व्यक्तीच्या सर्व गट क्रमांकांची प्रत्यक्ष पहाणी करुन व तपासुन दिले असुन ते सत्य आहे. ज्या गट नंबरमध्ये विहीर घ्यावयाची आहे त्या गट नंबरचा अंदाजे चतु:सिमा नकाशा खालीलप्रमाणे आहे.

उत्तर

पश्चिम  पुर्व

दक्षिण

सबब हे प्रमाणपत्र त्यांचे मागणीवरुन देण्यात येत आहे.

दिनांक :

गाव कामगार तलाठी
सजा

बैलजोडी नसल्याचे प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, श्री./श्रीमती ---------- रा. ---------- तालुका ----------, जिल्हा ---------- हे/या येथील रहिवाशी असुन त्यांचेकडे बैलजोडी नाही.

सबब हे प्रमाणपत्र त्यांचे मागणीवरुन देण्यात येत आहे.

दिनांक :

पशु वैद्यकीय अधिकारी

स्थळ पहाणी अहवाल

१. शेतकऱ्याचे संपुर्ण नाव :
२. गाव व तालुका :
३. जातीचे प्रमाणपत्र : आहे / नाही. त्यावर नमुद जात ----------
४. उत्पन्नाचे प्रमाणपत्र (सन २०१५-१६ चे) : एकुण वार्षिक उत्पन्न रु. ----------
५. कुटुंबाची माहिती (एकुण व्यक्ती) :
६. शासकीय / निमशासकीय सेवेत आहे किंवा कसे
७. सिंचन सुविधा उपलब्ध आहे काय ? असल्यास कोणती विहीर / पाटपाणी /इतर
८. जमीनीची प्रत (मध्यम / भारी / हलकी) व अभिप्राय : ----------
९. विहीर आहे / नाही
१०. कोणती बाब घेण्यास लाभधारक उत्सुक आहे
११. बैलजोडी हवी असल्यास वैरण / कडबा / घास उपलब्ध असल्याचे किंवा त्याची ऐपत / तयारी असल्याचे प्रत्यक्ष पहाणी अहवालावरुन निष्कर्ष :(जनावरे बांधण्यास जागा) ----------
१२. निवड करण्यासाठी कृषि अधिकारी यांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय :

लाभार्थीची मुळ कागदपत्रे मी स्वतः तपासली आहेत. लाभार्थी योजनेच्या निकषात बसत असुन त्याची निवड करण्याबाबत शिफारस आहे.

दिनांक :

कृषि अधिकारी (विघयो)
पंचायत समिती ----------

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की,
श्री./श्रीमती ---------- रा. ---------- तालुका ----------, जिल्हा ---------- यांची यापुर्वी या योजनेत निवड करण्यात आलेली नाही व त्यांना दुबार लाभ देण्यात येत नाही. याकरीता उपलब्ध कागदपत्रावरुन / रजिस्टर वरुन पडताळणी केली असुन ती खरी आहे म्हणुन त्यांची शिफारस करण्यात येत आहे.

दिनांक :

गट विकास अधिकारी
पंचायत समिती ----------

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की,
श्री./श्रीमती ---------- रा. ---------- तालुका ----------, जिल्हा ---------- यांनी आदिवासी उपयोजनेंतर्गत दयावयाच्या लाभाकरीता सादर केलेली सर्व कागदपत्रे तपासली आहेत. सदर योजनेंतर्गत निवड होणेसाठी त्यांची शिफारस करण्यात येत आहे.

दिनांक :

जिल्हा कृषि अधिकारी (विघयो)
जिल्हा परिषद ----------

प्रपत्र - ४

अनुसूचित जाती उपयोजना सन २०१६-१७ करीता लाभार्थी निवडीसाठी भौतिक लक्षांक व आर्थिक निधी

(रक्कम रु. लाखात)

अ. क्र.	जिल्हा	भौतिक (लाभार्थी संख्या)	आर्थिक
१	ठाणे	१३	२०.००
२	पालघर	०	५.००
३	रायगड	२७६	१४४.००
४	रत्नागिरी	२८६	१७२.१२
५	सिंधुदुर्ग	१६९	८७.८०
कोकण विभाग		**७४४**	**४२८.९२**
६	नाशिक	१६३	२००.००
७	धुळे	४२२	२२१.३०
८	नंदूरबार	५४	६०.००
९	जळगांव	५९८	३५०.००
नाशिक वि.		**१२३७**	**८३१.३०**
१०	अहमदनगर	१२७२	६६५.००
११	पुणे	२०६	२००.००
१२	सोलापूर	१३८४	८००.००
पुणे वि.		**२८६२**	**१६६५.००**
१३	सातारा	३२५	३९९.३०
१४	सांगली	५२०	३५०.००
१५	कोल्हापूर	१६२६	१०००.००
कोल्हापूर वि.		**२४७१**	**१७४९.३०**
१६	औरंगाबाद	२८८०	१४४०.४०
१७	जालना	११४१	७२६.००
१८	बीड	४०५	७४६.०९
औरंगाबाद वि.		**४४२५**	**२९१२.४९**
१९	लातूर	८८६	५५०.००
२०	उस्मानाबाद	६४१	३४५.००
२१	नांदेड	५१११	२६६२.००
२२	परभणी	४६१	५००.००
२३	हिंगोली	९९	४९०.००
लातूर वि.		**७१९८**	**४५४७.००**
२४	बुलढाणा	६१३	१२३९.१६
२५	अकोला	७९९	६००.००
२६	वाशिम	१६३२	८५०.००
२७	अमरावती	१९०५	१०४६.००
२८	यवतमाळ	१४४३	७५१.६६
अमरावती वि.		**६३९३**	**४४८६.८२**
२९	वर्धा	९८६	५९८.९५
३०	नागपूर	१०२२	५३२.४०
३१	भंडारा	४९८	३३०.००
३२	गोंदिया	८१६	४४०.००
३३	चंद्रपूर	१६१७	८४२.१२
३४	गडचिरोली	४४८	२७०.०१
नागपूर वि.		**५३८७**	**३०१३.४८**
एकूण राज्य		**३०७१७**	**१९६३४.३१**

सन २०१५-१६ मधील दायित्व व अभिकरण शुल्क वजा जाता शिल्लक राहणाऱ्या निधीच्या मर्यादेत लाभार्थी निवडीचे लक्षांक देण्यात आले आहेत. नवीन विहीरीचे लाभार्थी संख्या विचारात घेवून दिलेल्या लक्षांकापेक्षा कमी लाभार्थी निवड करावी. परंतु कोणत्याही परिस्थितीत जास्त लाभार्थी निवडुन शासनावर अतिरिक्त दायित्व निर्माण करु नये. अतिरिक्त दायित्वाची जबाबदारी कृषि विकास अधिकारी यांची राहील.